
ePaper

सीजेपीच्या तिन्ही मागण्या सरकारकडून मान्य; आंदोलन मागे

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 26 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






मोशी कचरा प्रश्नावर निखिल बोऱ्हाडे ॲक्शन मोडमध्ये!


## CJP च्या आंदोलनाला यश; केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा अखेर राजीनामा!

# धर्मेंद्र प्रधान OUT!

महाईन्यूज ।
नवी दिल्ली

**नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरून गेल्या एका महिन्यापासून दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी कॉक्रोच जनता पार्टीकडून करण्यात आली होती. याच मुद्यावरून पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक हे देखील बेमुदत उपोषणाला बसले होते. मात्र, २३ जुलै रोजी सोनम वांगचुक यांनी त्यांचं उपोषण सोडलं. सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडल्यानंतरही कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन सुरूच राहणार असल्याची घोषणा अभिजीत दीपके यांनी केली होती.**






हा लोकशाहीचा विजय आहे. थेट रस्त्यांवरून प्रत्यक्ष लोकशाहीचा विजय झाला आहे. शांतता, संयम आणि चिकाटीचा हा विजय आहे. सीजेपी, तसेच जेन झीचे अभिनंदन आणि ज्यांनी भीतीची भीती झुगारून देशाच्या कानाकोपऱ्यातून उठाव केला सर्व नागरिकांचे आभार. उत्तरदायित्वापासून, आता सुधारणांकडे.

- सोनम वांगचुक

### विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश

गेल्या एका महिन्यांपासून सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला अखेर मोठं यश आलं आहे. आज (२५ जुलै) केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश आल्याचं बोललं जात आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांनी मोठा जल्लोष केल्याचं पाहायला मिळत आहे.



कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत होता. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टी आणि विद्यार्थी ठाम होते. कॉक्रोच जनता पार्टीच्या या आंदोलनाला विरोधकांनी देखील पाठिंबा देत केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली होती. या सर्व घडामोडीनंतर आता दिल्लीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर आज (२५ जुलै) शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे.

गेल्या ३६ दिवसांपासून दिल्लीत जंतर मंतरवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीच्या मागणीला यश आलं असून धर्मेंद्र प्रधान शिक्षणमंत्री पदावरुन पायउतार झाले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. “आपण करुन दाखवलं”, असं म्हणत दीपके आणि आंदोलकांनी जंतर मंतरवर जल्लोष केला. “धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. हे काय म्हणत होते की, या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत”, अशी प्रतिक्रिया दीपकेंनी दिली.

### ‘मराठी मोडेल पण वाकणार नाही’



कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर जंतर-मंतरवर जल्लोष केला. “कॉक्रोचशी पंगा घेऊ नका”, असा इशाराही यावेळी अभिजीत दिपकेंनी दिला. “पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या, डोकी फोडून घेतली, या देशातील विद्यार्थ्यांनी मोठं हिम्मतीचे काम केले आहे. २० तारखेनंतर ज्या मुलांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, त्या सर्व केसेस मागे घेण्यात याव्यात”, अशी मागणी दिपकेंनी यावेळी केली. तसेच मराठी माध्यमांना उद्देशून अभिजीत दिपके म्हणाले की, मी मराठी माणूस आहे. मराठी मोडेल पण वाकणार नाही.

# पुणेकरांची पाण्याची चिंता मिटली

## संततधार पावसामुळे पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत कमालीची वाढ

**महाईन्यूज । पुणे**

**शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात संततधार कायम राहिल्यामुळे धरणांतील उपयुक्त पाणीसाठ्याने गेल्या वर्षीची सरासरी गाठली आहे. चारही धरणांमध्ये मिळून २३.४२ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढा उपयुक्त साठा असून, धरणे ८०.३५ टक्के भरली आहेत. गेल्या वर्षी याच दिवशी पाणीसाठा २३.६० टीएमसी एवढा होता. पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाल्यामुळे पुणेकरांच्या पाण्याची चिंता पुढील वर्षभरासाठी मिटणार आहे.**



दरम्यान, खडकवासला धरण शंभर टक्के भरले असून, धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रामध्ये सोडण्यात येत असलेल्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे. सध्या ९ हजार ३७३ क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येत असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. रात्री विसर्ग कमी करण्यात आला.

खडकवासला, पानशेत, वरसगांव आणि टेमघर या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे पाण्याची आवक मोठ्या प्रमाणावर होत असून, गेल्या २४ तासांत १.७२ टीएमसीने वाढ झाली. धरणांच्या पाणीपातळीत झपाट्याने होत असलेल्या वाढ आणि पाणलोट क्षेत्रातील अतिपर्जन्यमानामुळे खडकवासला धरणातून सुरू असलेल्या ४ हजार ७०८ क्युसेक विसर्गात वाढ करून तो ९ हजार ३७२ क्युसेक करण्यात आला. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त करण्यात येणार आहे. नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये तसेच नदीपात्रातील साहित्य तत्काळ हलवावे, दक्षता बाळगावी असे आवाहन जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, शुक्रवारी सकाळी सहा ते सायंकाळी पाच या कालावधीत खडकवासला धरण परिसरात १२, पानशेत येथे ४५, वरसगांव येथे ४३ आणि टेमघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ५५ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि उपनगरात जोरदार पाऊस झालेला आहे. पुढील काही दिवसांत आणखी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईसह उपनगरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यामुळे मुंबईकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटल्याचे म्हटले जात आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सात धरणातीलपाणीसाठ्यात गेल्या चोवीस तासात सहा टक्क्यांची वाढ झाली आहे.

### भीमा खोऱ्यातील पाच धरणे काठोकाठ

जिल्ह्यातील कळमोडी, चासकमान, वडिवळे, वीर, खडकवासला ही धरणे काठोकाठ भरली आहे. घोड, विसापूर, भामा-आसखेड, आंध्रा, पवना, कासारसाई ही धरणे भरण्याच्या मार्गावर आहेत. ही सर्व धरणे ९० टक्क्यांपेक्षा जास्त भरली असल्याची माहिती देण्यात आली. कासारसाई, चासकमान, वीर, वडीवळे, पवना, मुळशी या धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. अखंड पाणीपुरवठा करणाऱ्या ७ धरणांपैकी ४ धरणे अगदी काठोकाठ भरली आहेत.

# पुणे जिल्ह्यातील ६१ हजार ९०० शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा दिलासा

**महाईन्यूज । पुणे**

**राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६" अंतर्गत पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील (पीडीसीसी) ६१ हजार ९०० पात्र शेतकऱ्यांना ५२३ कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याची माहिती सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी येथे दिली.**



> राज्याची साखर कारखानदारी १६० वरून १०० दिवसच चालत आहे. आपल्याला एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढवून एकरी १०० टनांपर्यंत ऊस उत्पादन वाढवायचे आहे. ऊसशेतीतही एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढवून उसाच्या उत्पादकता व उत्पादन वाढीवर काम करावे लागेल. आधुनिक पद्धतीने व नव्या तंत्रज्ञानाचा अवलंबून करून शेती केल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही. पीडीसीसी बँकेने साखर कारखान्यांना सुमारे ७ हजार ८९८ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले आहे. एआय तंत्रज्ञानासाठी बारामती कृषिविज्ञान केंद्रासह आपण एआय क्षेत्रातील अन्य कंपन्यांकडून एक्सप्रेस ऑफ इंटरेस्ट मागवूयात. त्यांच्या चर्चा करून काही कंपन्यांचीही निवड करू. त्यातून योजना राबविताना शेतकऱ्यांकडे निवड ठेवता येईल.
>
> **- दिलीप वळसे पाटील माजी सहकारमंत्री व ज्येष्ठ संचालक, पीडीसीसी बँकपिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

जिल्हा बँकेने अजितदादा पवार यांच्या जयंतीच्या निमित्ताने अजितदादा पवार कृषी समृद्धी योजना शुभांरभ कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले, दिनांक २४ जुलै रोजी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची दोन लाखांपर्यंत थकीत कर्ज असलेली पात्र लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून, राज्यातील उर्वरित जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. राज्य शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील ५६ लाख पात्र शेतकऱ्यांना या कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळणार असून, ही रक्कम ४० हजार कोटी रुपये आहे. त्यासाठीच्या अटीही सुटसुटीत केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यांशी चर्चा करून आम्ही जिल्हा बँकांसाठी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये जिल्हा बँकांमध्ये जिल्ह्यातील ७० टक्के लोक व उर्वरित ३० टक्के उमेदवारांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच जिल्हा बँकांमधील शिपाई, वॉचमन, ड्रायव्हर यांना परीक्षेमधून आम्ही वगळले. गट सचिवांचे केडरही आम्ही केले.

त्यासाठी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पाठपुरावा केल्याबद्दल पाटील यांनी त्यांचे कौतुकही केले. विषमुक्त अन्नधान्य ही काळाची गरज असून, त्यावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्लाही त्यांनी कृषिमंत्र्यांना दिला. अजितदादा पवार यांना मी आयडॉल मानतो. दुर्दैवाने त्यांची जयंती पाळण्याची वेळ आपल्यावर आल्याचे म्हणत सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचे डोळे पाणावले.

# मोशी कचरा प्रश्नावर निखिल बोऱ्हाडे अ‍ॅक्शन मोडमध्ये!

## पर्यायी वेस्ट प्रोसेसिंग प्लॅन्टसाठी विविध जागांची पाहणी; डिफेन्सच्या जागेसाठीही पाठपुरावा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपोवरील वाढता ताण कमी करून शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी पर्यायी वेस्ट प्रोसेसिंग प्लॅन्ट उभारणीच्या दृष्टीने विविध जागांची पाहणी करण्यात आली. भारतीय जनता पार्टीचे 'क' प्रभाग (विजयदुर्ग) अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे यांनी या पाहणीत सक्रिय सहभाग घेत शहराच्या दीर्घकालीन कचरा व्यवस्थापनासाठी पर्यायी उपाययोजनांची आवश्यकता अधोरेखित केली.**






मोशी कचरा डेपोवरील कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी गवळीमाथा परिसर, पिंपरी परिसर तसेच संरक्षण विभागाच्या (डिफेन्स) अखत्यारीतील उपलब्ध जागांची पाहणी करण्यात आली. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार घनकचरा व्यवस्थापनाचे आव्हान अधिक गंभीर होत असून, मोशी डेपोवरील भार कमी करण्यासाठी विकेंद्रित आणि पर्यायी वेस्ट प्रोसेसिंग प्रकल्पांची उभारणी ही काळाची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या पाहणी दौऱ्यात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, क-क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, आरोग्य विभागाचे सहायक आरोग्य अधिकारी श्री. फल्ले, सुनील नरोटे तसेच वेस्ट प्रोसेसिंग प्लॅन्टशी संबंधित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

शहरातील कचरा समस्यांवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी पर्यायी वेस्ट प्रोसेसिंग प्लॅन्टसाठी संरक्षण विभागाच्या ताब्यातील उपलब्ध जागांचा वापर करता येण्याबाबत सकारात्मक चर्चा करून त्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती निखिल बोऱ्हाडे यांनी दिली. शहराच्या हितासाठी विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय साधून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निखिल बोऱ्हाडे म्हणाले की, "मोशी कचरा डेपोचा प्रश्न हा केवळ एका भागापुरता मर्यादित नसून संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराच्या पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित आहे. डेपोवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी वेस्ट प्रोसेसिंग प्रकल्प उभारणे अत्यंत आवश्यक आहे. संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील उपलब्ध जागेबाबत सकारात्मक भूमिका घेत आयुक्तांमार्फत आवश्यक पाठपुरावा करण्यात येणार आहे. शहराच्या भविष्यासाठी शाश्वत आणि वैज्ञानिक घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था उभी करावी लागणार आहे.

> "मोशी कचरा डेपोचा प्रश्न हा केवळ एका परिसराचा नसून, संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराच्या पर्यावरण, नागरिकांचे आरोग्य आणि भावी पिढ्यांच्या सुरक्षिततेशी निगडित आहे. त्यामुळे या प्रश्नावर तात्पुरते नव्हे, तर शाश्वत आणि वैज्ञानिक उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मोशी कचरा डेपोवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी वेस्ट प्रोसेसिंग प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने विविध जागांची पाहणी करण्यात येत असून, संरक्षण विभागाच्या ताब्यातील उपलब्ध जागेबाबतही सकारात्मक चर्चा करून महापालिका आयुक्तांकडे आवश्यक पाठपुरावा करण्यात येणार आहे. शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक सक्षम, पर्यावरणपूरक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, भविष्यात मोशीसारखी परिस्थिती निर्माण होणार नाही, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्राधान्य दिले जाईल."
>
> - निखिल बोऱ्हाडे, अध्यक्ष, 'क' प्रभाग (विजयदुर्ग), भारतीय जनता पार्टी.

# महापौर रवि लांडगे यांचा दिल्ली दौरा ठरला विकासाचा रोडमॅप

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी दिल्ली दौऱ्यात विविध केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेऊन शहराशी संबंधित महत्त्वाचे प्रश्न आणि विकास प्रकल्प केंद्र सरकारसमोर मांडले. रेड झोनमुक्ती, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प, क्रीडा क्षेत्राचा विकास, महिला औद्योगिक क्लस्टर उभारणी आदी विषयांवर सविस्तर चर्चा करत शहराच्या विकासासाठी आवश्यक निर्णय तातडीने घेण्याची मागणी त्यांनी केली.**



दिल्ली दौऱ्यादरम्यान महापौर लांडगे यांनी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन पिंपरी-चिंचवडमधील रेड झोनचा प्रश्न मांडला. संरक्षण विभागाच्या निर्बंधांमुळे नागरिकांना बांधकाम परवानग्या, पुनर्विकास, मालमत्ता व्यवहार आणि बँक कर्जांमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी संरक्षण मंत्रालय, महाराष्ट्र शासन, संरक्षण प्राधिकरण आणि महापालिका यांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी करण्यात आली. तसेच प्रत्यक्ष शहराला भेट देण्याचे निमंत्रणही देण्यात आले.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग (एनएच-६०) आठपदरीकरणासाठी प्रलंबित भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून कामाला गती देण्याची मागणी करण्यात आली. भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्यास कायम ठेवावा तसेच मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष काम सुरू करण्याचीही विनंती करण्यात आली.

केंद्रीय युवा व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासमवेत झालेल्या चर्चेत पिंपरी-चिंचवडमध्ये 'मेयर्स कप' ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. यासोबतच 'खेलो इंडिया' आणि 'फिट इंडिया' अभियानांतर्गत सहकार्य, आर्थिक मदत आणि शहरासाठी स्वतंत्र क्रीडा धोरण तयार करण्याबाबतही चर्चा झाली.

याच दौऱ्यात केंद्रीय एमएसएमई मंत्री जितराम मांझी यांचे प्रमुख सल्लागार संदीप पोखरकर यांच्यासोबत महिला औद्योगिक क्लस्टर उभारणी, महिला उद्योजकांना प्रोत्साहन, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी विशेष निधी, प्रशिक्षण आणि तांत्रिक सहाय्य यासंदर्भात सकारात्मक चर्चा करण्यात आली. स्थानिक युवक-युवतींसाठी रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी केंद्र सरकारचे सहकार्य मिळावे, अशी मागणीही करण्यात आली.

दिल्ली दौऱ्यातील सर्व बैठकींमध्ये शहराच्या वाढत्या लोकसंख्येला पूरक आधुनिक पायाभूत सुविधा, केंद्र शासनाच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ आणि विकासाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची भूमिका महापौर रवि लांडगे यांनी मांडली.

> "पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांशी सातत्याने समन्वय साधून शहराचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. रेड झोनमुक्ती, राष्ट्रीय महामार्ग, क्रीडा सुविधा, महिला उद्योग क्लस्टर यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा झाली असून, या सर्व प्रकल्पांना लवकरच गती मिळेल, असा विश्वास आहे. शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या हितासाठी माझा पाठपुरावा यापुढेही अधिक ताकदीने सुरू राहील."
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका



## भूमिका

**दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनाने गेल्या काही दिवसांत देशाच्या राजकीय आणि सामाजिक चर्चेला वेगळे वळण दिले. सुरुवातीला पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था आणि सोनम वांगचुक यांच्या उपोषणाभोवती केंद्रित असलेले हे आंदोलन अल्पावधीतच व्यापक तरुणांच्या असंतोषाचे प्रतीक बनले.**

# शिक्षण, रोजगार आणि जंतर-मंतरचा संदेश



विशेष म्हणजे, समाजमाध्यमांवर विनोद म्हणून सुरू झालेल्या "कॉक्रोच जनता पार्टी" (सीजेपी) या संकल्पनेने हजारो नव्हे तर लाखो तरुणांना एकत्र आणले. त्यामुळे हा केवळ एका संघटनेचा कार्यक्रम न राहता तरुणांच्या भावना व्यक्त करणारे व्यासपीठ बनला. या आंदोलनाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे शिक्षणासारख्या मूलभूत प्रश्नाला केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न.

सरकारवर धार्मिक किंवा जातीय मुद्द्यांवर राजकारण केल्याचा आरोप करत अनेक तरुणांनी रोजगार, परीक्षा आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवर आवाज उठवला. विविध राज्यांतील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढत गेला आणि आंदोलनाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. दरम्यान, पोलिसांची नाकाबंदी, लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर यामुळे परिस्थिती अधिक चिघळली.

शांततापूर्ण आंदोलनावर बलप्रयोग झाल्याचे आरोप झाले, तर प्रशासनाने कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक कारवाई केल्याचे म्हटले. अशा परिस्थितीत संवादाऐवजी संघर्षाचे चित्र निर्माण झाल्याने सरकारवर टीका वाढली.

कोणत्याही लोकशाहीत आंदोलनकर्त्यांशी संवाद हा पहिला पर्याय असायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दुसरीकडे, समाजमाध्यमांनी या आंदोलनाला अभूतपूर्व वेग दिला. देशभरातून आंदोलकांसाठी अन्न, औषधे आणि आर्थिक मदत पोहोचू लागली. जेन-झी पिढीने मीम्स, व्यंगचित्रे आणि सर्जनशील घोषणांमधून आंदोलन अधिक प्रभावी केले. गंभीर विषय मांडण्याची ही नवी शैली काहींना अपरंपरागत वाटली, तरी त्यामुळे आंदोलन अधिक व्यापक जनतेपर्यंत पोहोचले.

मात्र, आंदोलनाचा विस्तार होत असताना त्यात विविध प्रश्न मिसळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे मूळ उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित ठेवणे हे आंदोलनकर्त्यांसाठी तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. अन्यथा विषय भरकटण्याचा आणि विरोधकांना आंदोलनावर टीका करण्याची संधी मिळण्याचा धोका नाकारता येणार नाही.

जंतर-मंतरवरील घडामोडींनी एक गोष्ट स्पष्ट केली आहे— देशातील तरुण केवळ प्रेक्षक राहिलेले नाहीत. शिक्षण, रोजगार आणि पारदर्शक प्रशासन यांसारख्या प्रश्नांवर ते संघटितपणे आवाज उठवण्यास तयार आहेत. सरकारनेही या असंतोषाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या चौकटीत न पाहता संवाद, विश्वास आणि ठोस धोरणात्मक निर्णयांच्या माध्यमातून उत्तर देण्याची गरज आहे. कारण लोकशाहीत आंदोलन दडपून नव्हे, तर संवादातूनच प्रश्नांचा शाश्वत मार्ग निघतो.

## प्रासंगिक »

### प्रत्यक्ष अनुभव

**एका आश्रमात रोज सकाळ-संध्याकाळ धूप जाळला जाई, तर गोठ्यात कडुनिंबाचा पाला जाळला जात असे. एका शिष्याला हा भेदभाव वाटला.**

तो महात्म्यांना म्हणाला, “माणसांसाठी सुगंधी धूप आणि जनावरांसाठी कडवट धूर का?” महात्म्यांनी त्याचे म्हणणे ऐकून त्यालाच एक महिना दोन्हीकडे धूप जाळण्यास सांगितले.

महिनाभर सर्वत्र सुगंध दरवळला; पण धूपाचा खर्च आश्रमाला परवडेनासा झाला. मग शिष्याने दोन्हीकडे कडुनिंबाचा पाला जाळण्यास सुरुवात केली. त्यामुळे कीटक दूर राहिले, मात्र कडवट धुरामुळे आश्रमात येणाऱ्या भक्तांची संख्या कमी झाली.

काही दिवसांतच शिष्याला आपल्या निर्णयाची चूक उमगली. त्याने महात्म्यांची क्षमा मागितली. त्यानंतर पूर्वीप्रमाणे आश्रमात धूप आणि गोठ्यात कडुनिंबाचा पाला जाळण्याची पद्धत पुन्हा सुरू झाली.

- तात्पर्य : प्रत्यक्ष अनुभवातून मिळालेले ज्ञानच खरे आणि टिकाऊ असते. केवळ तर्काने नव्हे, तर अनुभूतीनेच माणूस शहाणा होतो.

दूध हा प्रत्येक कुटुंबाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे ग्राहकांना शुद्ध, सुरक्षित आणि निर्भेळ दूध मिळणे हा केवळ बाजारपेठेचा नव्हे, तर त्यांचा मूलभूत हक्क आहे.

## निर्भेळ दुधाचा हक्क आणि मराठी ब्रॅण्डची गरज



अलीकडे राज्यात भेसळयुक्त दूध आणि दुग्धजन्य पदार्थांवर सुरू झालेल्या कारवाईमुळे हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. कर्नाटकने 'नंदिनी' या सहकारी दूध ब्रॅण्डला केवळ व्यावसायिक उत्पादन म्हणून नव्हे, तर राज्याच्या अस्मितेचे प्रतीक म्हणून जपले.

त्यामुळे बाहेरील स्पर्धेला तोंड देतानाही नंदिनीने आपली मजबूत ओळख कायम ठेवली. पंजाबचे 'व्हरका', तमिळनाडूचे 'आवीन', केरळचे 'मिल्मा' आणि राजस्थानचे 'सरस' हेही त्याच धर्तीवर यशस्वी ठरले आहेत. मात्र सहकाराची परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रात आज राज्यव्यापी प्रभावी सहकारी दूध ब्रॅण्ड नसणे ही खंत आहे. एकेकाळी आघाडीवर असलेली 'महानंद' आज पुनरुज्जीवनाच्या प्रतीक्षेत आहे.

दुग्धक्रांतीचे शिल्पकार डॉ. वर्गीस कुरियन यांनी शेतकरी आणि ग्राहक यांना थेट जोडणाऱ्या सहकारी व्यवस्थेचा पुरस्कार केला होता. मध्यस्थांची संख्या कमी असेल, तर गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणे अधिक सोपे होते, असा त्यांचा विश्वास होता.

आज अनेक खासगी कंपन्याही चांगले काम करत असल्या, तरी मजबूत सहकारी ब्रॅण्ड ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करतात. राज्यात अन्न व औषध प्रशासनाने भेसळविरोधात सुरू केलेल्या कठोर मोहिमेनंतर दूध संकलनात घट आणि त्याचवेळी काही सहकारी ब्रॅण्डच्या विक्रीत वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. यावरून ग्राहकांचा कल विश्वासार्ह आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनांकडे असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र हा देशातील मोठा दूध उत्पादक प्रदेश आहे.

त्यामुळे केवळ दूध उत्पादनात नव्हे, तर स्वतःचा सक्षम, आधुनिक आणि विश्वासार्ह 'मराठी' सहकारी दूध ब्रॅण्ड उभारण्यातही राज्याने पुढाकार घेण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना योग्य दर, ग्राहकांना शुद्ध दूध आणि सहकाराला नवे बळ देणारे हे पाऊल ठरू शकते. निर्भेळ दूध हा ग्राहकांचा हक्क आहे आणि तो जपण्यासाठी सक्षम सहकारी व्यवस्था उभी करणे ही काळाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आम्ही जरी आस ।
जालों टाकोनि उदास ॥१॥

आतां कोण भय धरी ।
पुढें मरणाचें हरी ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जेन झीने सरकारच्या झिंज्या उपटल्या

## अभिजीत दिपके यांची जी काही भूमिका असेल त्याला आम्ही पाठिंबा देऊ

महाईन्यूज । मुंबई

**धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला आहे. त्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीला सर्वात मोठं यश मिळालं आहे. कॉक्रोच जनता पार्टीने धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. ३६ दिवस आंदोलन केल्यानंतर या आंदोलनाला यश आलं आहे. कारण धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. या मुद्द्यावर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भाष्य केलं. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत राज ठाकरेंनी हे भाष्य केलं आहे.**



"शिवाजी पार्क मैदानावर उद्या अभिनंदन मोर्चा पार पडेल. कारण तरुणाईचा हा खूप मोठा विजय आहे. एका वाक्यात सांगायचं झालं तर जेन झीने सरकारच्या झिंज्या उपटून जमिनीवर आणलं आहे. तरुणांचा हा खूप मोठा विजय आहे. अभिजीत दिपकेंचा हा खूप मोठा विजय आहे. कुठल्याही गोष्टीला मस्तवालपणे उत्तर देणारं जे सरकार आहे त्या सरकारला माघार घ्यावी लागली. कारण आंदोलन खूप मोठ्या प्रमाणावर उभं राहिलं. तसंच आता तरुणाईचा राग हा प्रधानांवर पंतप्रधानांवर गेला आहे. अभिजीत दिपके जे भूमिका घेतलेली भूमिका आहे त्याला आमचा पाठिंबा असेल." असं राज ठाकरे यांनी जाहीर केलं.

भाजपा जेव्हा विरोधात होता तेव्हा रेल्वे अपघात झाल्यावर ते रेल्वे मंत्र्याचा राजीनामा मागयचे की नाही? रेल्वे मंत्री बसलेला असायचा का ड्रायव्हिंग सीटवर? नाही. तरीही ते राजीनामा मागायचे. एक ड्रायव्हर असायच्या ज्याच्या चुकीमुळे अपघात व्हायचा. आता शिक्षण मंत्री प्रधान असताना नीटचा पेपर कितीवेळा फुटला? याला काही महत्त्व देणार की नाही? त्यांच्या मनात काय आहे हे आता पाहून काय करायचं आहे? सगळ्या गोष्टींची जबाबदारी घेणार की नाही? धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यायला इतका वेळ लावायचीच नव्हती. आम्हाला कोण काय करणार? हे जे सरकारचं धोरण होतं ना त्या सगळ्यांना तरुणाईने रस्त्यावर आणलं आहे. असंही राज ठाकरेंनी म्हटलं आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षकांनी मारु नये, हात लावू नये असा नियम आहे. मग लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर कारवाई का नको? काय केलं होतं त्या मुलांनी? की इतका अमानुष अत्याचार केला? असेही प्रश्न राज ठाकरेंनी उपस्थित केले आहेत.

NEET पेपरफुटी प्रकरणी दिल्लीत सलग २८ दिवस तरुणांनी दडपशाहीला न घाबरता दिलेला लढा अत्यंत कौतुकास्पद आहे. हा लोकशाहीचा आणि युवा शक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे. अत्यंत संयमाने आणि शांततेच्या मार्गाने युवा पिढीने आपल्या भावना मांडल्या आणि शेवटी त्यांच्या संघर्षाला यश आले," असे पवार म्हणाले.

### राज ठाकरे काय म्हणाले?

दिल्लीत आंदोलन सुरु असताना शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची दिल्लीत बुधवारी भेट घेतली. त्याबाबत प्रश्न विचारला असता, यालाच जंतर-मंतर असं म्हणतात हे उत्तर दिलं. शरद पवार यांच्याबाबत राज ठाकरेंनी हे भाष्य करताच उपस्थित पत्रकारांना हशा पिकला. जंतर-मंतर हे दिल्लीच्या मैदानाचं नाव आहे. तर जंतर-मंतर या शब्दाचा अर्थ जादू किंवा किमया असाही होतो. राज ठाकरेंनी एका अर्थाने शरद पवार हे राजकारणात काहीही करु शकतात असं म्हणत अवघ्या तीन शब्दात प्रतिक्रिया दिली आहे.

## महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्याकडून धर्मेंद्र प्रधानांचं कौतुक

महाईन्यूज । मुंबई

**शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर राजीनामा दिला आहे. यावर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री भाजपा नेते आणि राज्यसभा खासदार अशोक चव्हाण सोशल मीडियावर एक विशेष पोस्ट शेअर केली आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा विद्यार्थी चळवळीपासून सुरू झालेला प्रवास आणि त्यांचे कार्य यावर प्रकाश टाकत चव्हाणांनी त्यांचं कौतुक केलं आहे.**



अशोक चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, "धर्मेंद्र प्रधान यांनी भारताचे शिक्षण मंत्री म्हणून आपली जबाबदारी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. या पार्श्वभूमीवर, त्यांचा विद्यार्थी चळवळींशी असलेला जुना संबंध आणि सार्वजनिक जीवनातील त्यांचे योगदान लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. राजकीय प्रवासात तरुणांच्या अपेक्षा, चिंता आणि आकांक्षांशी इतक्या जवळून जोडलेले खूप कमी नेते पाहायला मिळतात."

शिक्षण क्षेत्राचा पाया मजबूत करण्यासाठी आणि देशातील शैक्षणिक व्यवस्थेला भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करण्यासाठी धर्मेंद्र प्रधान यांनी प्रामाणिक प्रयत्न केले, असेही चव्हाणांनी नमूद केले.

शिक्षण क्षेत्रातील निर्णयप्रक्रियेचा संदर्भ देताना अशोक चव्हाण म्हणाले, "एखाद्याच्या प्रत्येक निर्णयाशी प्रत्येक जण सहमत असेलच असे नाही; परंतु धर्मेंद्र प्रधान यांनी आपली जबाबदारी अत्यंत निष्ठा, ऊर्जा आणि स्पष्ट ध्येयाने पार पाडली, याबद्दल शंका असण्याचे काहीच कारण नाही."

"शिक्षण क्षेत्राचे नेतृत्व करणे हे कधीही सोपे नसते. करोडो विद्यार्थ्यांचे हित डोळ्यांसमोर ठेवून सर्व घटकांच्या अपेक्षांचा समतोल साधावा लागतो. ही कठीण जबाबदारी प्रधान यांनी अत्यंत निष्ठेने आणि चिकाटीने पेलली," असे मत चव्हाणांनी व्यक्त केले. "भारतातील शिक्षण क्षेत्राच्या भविष्याबाबत त्यांनी सुरू केलेली महत्त्वपूर्ण चर्चा आगामी काळातही सातत्याने पुढे जात राहील," असे अशोक चव्हाण यांचे मत आहे.

### धर्मेंद्र प्रधानांच्या भावी वाटचालीसाठी दिल्या शुभेच्छा

आपल्या पोस्टच्या शेवटी अशोक चव्हाण यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या देशसेवेबद्दल आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "विद्यार्थ्यांप्रती असलेली तुमची बांधिलकी आणि राष्ट्रउभारणीतील योगदानाबद्दल धन्यवाद! आगामी काळात तुमच्यावर जी काही नवीन जबाबदारी येईल, त्यात तुम्हाला उत्तम आरोग्य, शक्ती आणि यश मिळो," अशा शब्दांत चव्हाणांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# भारतीय IT व्यावसायिकांना मोठा दिलासा!

## डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाला बॉस्टनस्थित 'फर्स्ट यू.एस. सर्किट कोर्ट ऑफ अपील'चा मोठा झटका

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिका सरकारने उच्च कौशल्य असलेल्या परदेशी कर्मचाऱ्यांसाठी H-1B व्हिसावर १ लाख अमेरिकन डॉलर (सुमारे ८० लाख रुपयांपेक्षा जास्त) शुल्क आकारण्याचा निर्णय कनिष्ठ न्यायालयाने रद्द केला होता. या निर्णयाला स्थगिती देण्याची ट्रम्प प्रशासनाची विनंती अपील कोर्टाने फेटाळून लावली आहे. बॉस्टनस्थित 'फर्स्ट यू.एस. सर्किट कोर्ट ऑफ अपील'ने कनिष्ठ न्यायालयाच्या ८ जूनच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला.**






ट्रम्प प्रशासनाने H-1B व्हिसा अर्जावर १ लाख डॉलरचे प्रचंड शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, जून 2026 मध्ये अमेरिकेतील जिल्हा न्यायालयाने हा निर्णय रद्दबातल ठरवला होता. "संसदेच्या (मान्यतेशिवाय एवढे मोठे शुल्क आकारणे हे बेकायदेशीर करासारखे (UNLAWFUL TAX) आहे," असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने हे शुल्क रद्द केले होते.

आता बॉस्टनस्थित 'फर्स्ट यू.एस. सर्किट कोर्ट ऑफ अपील्स'ने कनिष्ठ न्यायालयाच्या ८ जून रोजीच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिला. डेमोक्रॅटिक पक्षाच्या २० राज्यांच्या ॲटर्नी जनरल यांनी या शुल्काविरोधात याचिका दाखल केली होती. हा कर संसदेची मान्यता न घेता लावण्यात आलेला बेकायदेशीर कर असल्याचे सांगत न्यायालयाने तो रद्दबातल ठरवला होता.

H-1B कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ६५,००० व्हिसा दिले जातात, तर उच्च पदवीधारक कामगारांसाठी अतिरिक्त २०,००० व्हिसा राखीव असतात. हे व्हिसा ३ ते ६ वर्षांच्या कालावधीसाठी मंजूर केले जातात. ट्रम्प यांच्या या निर्णयापूर्वी परदेशी कामगारांसाठी व्हिसा मागणाऱ्या रोजगारदात्यांना विविध घटकांवर आधारित सामान्यतः $२,००० ते $५,००० एवढेच शुल्क द्यावे लागत असे.

या शुल्कात मोठी वाढ करताना ट्रम्प यांनी दावा केला होता की, "अमेरिकन कामगारांना मदत करण्याऐवजी, कमी पगाराच्या आणि कमी कुशल परदेशी कामगारांद्वारे त्यांना हटवण्यासाठी H-1B योजनेचा गैरवापर केला जात आहे."दरम्यान, हे नवीन शुल्क अमेरिकेत आधीपासूनच विद्यार्थी व्हिसावर असलेल्या परदेशी नागरिकांना लागू होणार नाही. नव्या H-1B व्हिसाधारकांमध्ये अशा विद्यार्थ्यांचा मोठा वाटा असतो. हे शुल्क लागू झाल्यापासून फारच कमी रोजगारदात्यांनी ते भरले आहे.या न्यायालयीन निर्णयावर व्हाईट हाऊसकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

### भारतीय आयटी कंपन्यांना मोठा दिलासा

अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्या, विशेषतः आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपन्या, दरवर्षी भारतमधून हजारो कुशल कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी H-1B व्हिसाचा वापर करतात. आता H-1B संदर्भात बॉस्टनस्थित 'फर्स्ट यू.एस. सर्किट कोर्ट ऑफ अपील'ने कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय ठेवला कायम ठेवल्याने भारतीय आयटी व्यावसायिक आणि भारतीय कंपन्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर सोनम वांगचुक यांनी व्यक्त केली बदलाची अपेक्षा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नीट पेपरफुटी प्रकरणावरून दिल्लीत सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश आलं आहे. आज (२५ जुलै) अखेर धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मागील एका महिन्यापासून कॉक्रोच जनता पार्टीकडून दिल्लीत आंदोलन सुरू होतं. या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळाला होता. नीट पेपरफुटी प्रकरण आणि विद्यार्थ्यांच्या आदोलानंतर केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली होती.**



### प्रधान यांच्या राजीनाम्यावर वांगचुक काय म्हणाले?

सोनम वांगचुक यांनी पोस्टमध्ये म्हटलं की, “हा लोकशाहीचा विजय आहे. थेट रस्त्यांवरून प्रत्यक्ष लोकशाहीचा विजय झाला आहे. शांतता, संयम आणि चिकाटीचा हा विजय आहे. सीजेपी, तसेच ‘जेन झी’चे अभिनंदन आणि ज्यांनी भीती झुगारून देशाच्या कानाकोपऱ्यातून उठाव केला, सर्व नागरिकांचे आभार.” उत्तरदायित्वापासून, आता सुधारणांकडे” असं सोनम वांगचुक यांनी म्हटलं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यावर प्रतिक्रिया देताना सोनम वांगचुक यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत आनंद व्यक्त केला. हा लोकशाहीचा विजय आहे.

या घडामोडीनंतर अखेर आज धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता अनेकांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर सोनम वांगचुक यांनी पहिली प्रतिक्रिया देत हा लोकशाहीचा विजय असल्याचं म्हटलं आहे. तसेच ‘आता शिक्षण व्यवस्थेत सुधारणा व्हावी आणि देश चालवण्याची पद्धत आता तरी बदलेल’, अशी अपेक्षा सोनम वांगचुक यांनी सरकारकडे व्यक्त केली आहे.

“आमच्या देशाच्या लोकशाहीची जी शक्ती आहे, ती शांततेमुळे आहे. विद्यार्थ्यांचा विजय निश्चितच झालेला आहे, पण आपल्या विजयातही विनम्रता असली पाहिजे. तसेच फक्त एका राजीनाम्यामुळे राष्ट्र बनत नसतं. आता शिक्षण व्यवस्थेत देखील बदल झाले पाहिजेत. देशाच्या शिक्षण व्यवस्थेत काही सुधारणा झाल्या पाहिजेत. मला अपेक्षा आहे की सरकार आता त्यांच्या कामातही सुधारणा करेल”, अशी अपेक्षा सोनम वांगचुक यांनी व्यक्त केली.

“फक्त शिक्षण व्यवस्थेतच नाही, तर प्रशासन चालवण्याच्या पद्धतीत देखील सुधारणा केल्या पाहिजेत. प्रेमाने आणि संवादाने देश चालवला जाऊ शकतो. कोणावरही अन्याय होऊ नये, देश कायम सत्याच्या मार्गाने चालवला गेला पाहिजे. देशात जिथे कुठे भ्रष्टाचार असेल, तो भ्रष्टाचार संपवला पाहिजे. भारत कायम जगासाठी एक चांगलं उदाहरण, विश्वगुरु बनला पाहिजे”, अशी अपेक्षा सोनम वांगचुक यांनी व्यक्त केली.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर सोनम वांगचुक यांनी या घडामोडीवर मोठी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी हा निर्णय म्हणजे लोकशाही आणि शांततापूर्ण जनआंदोलनाचा मोठा विजय असल्याचे म्हटले आहे. तसेच, सोशल मीडियावर विक्ट्री साइन दाखवत त्यांनी देशभरातील तरुण वर्ग आणि नागरिकांचे अभिनंदन केले असून, आता शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्याची वेळ आल्याचे म्हटले आहे. हा निर्णय थेट रस्त्यावर उतरून केलेल्या शांततापूर्ण जनआंदोलनाचा आणि देशातील युवकांच्या संयमाचा परिणाम असल्याचे त्यांनी सांगितले.

# आकांक्षाने गौरव खन्नाची तुलना थेट केली श्वानासोबत

अभिनेत्री आकांक्षा चमोला ( Akanksha Chamola )'लॉक अप सीझन २'च्या सीझनमध्ये सातत्याने नवे खुलासे करत आहे. आता पुन्हा एकदा आकांक्षाने केलेल्या एका वक्तव्याची सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. तिचा पती आणि प्रसिद्ध अभिनेता गौरव खन्ना याच्या शोमधील भेटीबद्दल बोलताना आकांक्षानं त्याला अनोळखी व्यक्ती म्हणून संबोधलं आणि त्याच्याऐवजी कुटुंबातील कोणी किंवा पेट डॉग आला असता तरी चाललं असतं, असं म्हटलं. यावरून नेटकऱ्यांनी तिच्यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. शोमध्ये जेव्हा स्पर्धक धीरज धूपरची पत्नी विन्नी अरोरा आणि इतर कुटुंबीय भेटायला आले, तेव्हा कौटुंबिक भेटींबद्दल चर्चा सुरू होती. यावेळी सह-स्पर्धक श्रेया कालरा आणि शिल्पा शिंदे यांच्याशी संवाद साधताना आकांक्षाने गौरव खन्नाच्या भेटीवर नाराजी व्यक्त केली. आकांक्षाने आपल्या पतीची तुलना थेट श्वानासोबत केल्यामुळे प्रेक्षक आणि गौरव खन्नाचे चाहते प्रचंड संतापले आहेत. अनेकांनी तिला आकांक्षा एक 'फेम डिगर' असल्याचे म्हंटले आहे. तसेच 'गौरव खन्नाच्या नावाचा वापर करून फक्त प्रसिद्धी मिळवण्यासाठी ती शोमध्ये आली आहे', असेही नेटकरी म्हणत तिच्यावर टीका करत आहे. आकांक्षा म्हणाली की, गौरव माझ्यासाठी नाही, तर स्वतःसाठी आला होता. माझ्यासाठी तर तो 'एक्स' आणि स्ट्रेंजरसारखाच आहे. त्याच्या ऐवजी माझ्या कुटुंबातील दुसरं कुणी आलं असतं, तर मला बरं वाटलं असतं, कम्फर्ट मिळाला असता. माझी आई, वडील किंवा माझा पाळीव कुत्रा जरी आला असता, तरी मला जास्त आनंद झाला असता. तिच्या या वक्तव्यानंतर शोमधील इतर सदस्य हसू लागले असले, तरी बाहेर सोशल मीडियावर मात्र यावरून तिच्यावर टीका केली जात आहे.





## 'सैयारा'नंतर अहान पांडेचा ॲक्शन अवतार

सैयारा' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये दमदार पदार्पण करणारा अभिनेता अहान पांडे आता आपल्या दुसऱ्या चित्रपटासाठी सज्ज झाला आहे. पहिल्याच चित्रपटातून रोमँटिक हिरो म्हणून प्रेक्षकांची पसंती मिळवलेल्या अहानचा यावेळी पूर्णपणे वेगळा अंदाज पाहायला मिळणार आहे. तो एका बिग बजेट ॲक्शन-रोमान्स चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकणार असून त्याच्यासोबत अभिनेत्री शर्वरी पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अली अब्बास जफर करत असून निर्मितीची धुरा यशराज फिल्म्सचे प्रमुख आदित्य चोप्रा यांनी सांभाळली आहे. चित्रपटाचे नाव अद्याप जाहीर करण्यात आलेले नसले, तरी त्याच्या प्रदर्शनाची तारीख निश्चित करण्यात आली आहे. हा चित्रपट २६ मार्च २०२७ रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## या सरकारमध्ये प्रभू श्री रामांचे सैनिक

नीट पेपरफुटी प्रकरणावरुन राजकारण चांगलचं तापलं असून, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप होत आहेत. गेल्या एका महिन्यापासून दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाचा मुख्य उद्देश केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देणं हा आहे. या आंदोलनाला विद्यार्थ्यांवर २० जुलैच्या दिवशी पोलिसांकडून झालेल्या लाठीचार्जमुळे गालबोट लागलं. या भीषण परिस्थितीचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावरुन समोर आल्यानंतर सर्वच स्तरातून संतप्त प्रतिक्रिया समोर आल्या. मनोरंजनविश्वातील अनेक कलाकारांनी विद्यार्थी आंदोलनाला समर्थन दिलं आहे. तर काही कलाकार समर्थन देत सरकारवर होत असलेल्या आरोपांची बाजू तर घेत नाहीत.



# ‘फिडे’च्या अध्यक्षपदी आनंद

## द्वोर्कोविच यांनी अधिकार स्थगित केल्यानंतर आनंदवर हंगामी अध्यक्षपदाची जबाबदारी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचे (फिडे) विद्यमान अध्यक्ष अर्कादी द्वोर्कोविच यांचे नाव युरोपीय महासंघाने (इयू) निर्बंधांच्या यादीत समाविष्ट केल्यानंतर त्यांनी तात्पुरते पदापासून दूर होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ‘फिडे’च्या नियमावलीनुसार उपाध्यक्ष आणि भारताचा माजी जगज्जेता बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदकडे हंगामी अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. अध्यक्षपद सांभाळणारा तो पहिला भारतीय आहे.**



महासंघाचे माजी उपाध्यक्ष तसेच ग्रँडमास्टर बशार कुआतली यांनी या नियुक्तीचे स्वागत करताना ‘फिडे’च्या हंगामी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारणारा पहिला भारतीय ठरल्याबद्दल आनंदचे अभिनंदन केले. दुसरीकडे, ‘फिडे’च्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत द्वोर्कोविच यांनी घेतलेल्या निर्णयाचे आनंदने कौतुक केले. महासंघाची परिषद, प्रशासकीय यंत्रणा आणि सर्व सदस्य संघटनांच्या सहकार्याने कामकाजात सातत्य राखण्यावर आपला भर राहील, असे आनंदने स्पष्ट केले.

द्वोर्कोविच यांनी उभारलेली सक्षम कार्यसंस्कृती, विकासाचा आराखडा आणि जागतिक बुद्धिबळाच्या प्रसारासाठी सुरू असलेले उपक्रम पुढे नेण्याची जबाबदारी आता संपूर्ण संघटनेची असल्याचेही आनंदने नमूद केले. आनंद २०२२ सालापासून ‘फिडे’चे उपाध्यक्षपद भूषवत आहे.

रशिया-युक्रेन यांच्यात अजूनही सुरू असलेल्या युद्धाशी संबंधित काही व्यक्तींची नावे युरोपीय महासंघाच्या २१व्या निर्बंधांच्या यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यात रशियन नागरिक असलेल्या द्वोर्कोविच यांचाही समावेश आहे. “युरोपीय महासंघ आणि स्वित्झर्लंडमधील लागू असलेल्या कायद्यांनुसार माझ्यावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. या निर्बंधांमुळे ‘फिडे’च्या दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याने मी अध्यक्षपदाचे अधिकार आणि जबाबदाऱ्या तातडीने स्वेच्छेने स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे,” असे द्वोर्कोविच यांनी निवेदनात नमूद केले.

ऑलिम्पियाडसाठी गुकेश, प्रज्ञानंद संघात आगामी बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेसाठी भारतीय संघाची शुक्रवारी घोषणा करण्यात आली. खुल्या विभागात जगज्जेता दोम्माराजू गुकेश, आर. प्रज्ञानंद, अर्जुन एरिगेसी, निहाल सरीन आणि विदित गुजराथी, तर महिला विभागात कोनेरू हम्पी, आर. वैशाली, दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल आणि सविता श्री यांच्यावर भारताची भिस्त असेल. सांघिक स्वरूपातील ही स्पर्धा १५ ते २७ सप्टेंबर या कालावधीत समरकंद, उझबेकिस्तान येथे रंगणार आहे. भारताने गेल्या ऑलिम्पियाडमध्ये खुल्या विभागात सुवर्णपदक जिंकत इतिहास घडवला होता.

### सप्टेंबरमध्ये निवडणूक

सप्टेंबरमध्ये उझबेकिस्तान येथे होणाऱ्या ४६व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेदरम्यान ‘फिडे’ची महासभा होणार असून त्याच वेळी अध्यक्षपदाची निवडणूकही होईल. द्वोर्कोविच यांची यापूर्वी २०१८ आणि २०२२ अशी सलग दोन वेळा अध्यक्षपदी निवड झाली होती. ते सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी निवडणूक लढविण्याच्या तयारीत आहेत. यावेळी कझाकस्तान बुद्धिबळ महासंघाचे अध्यक्ष तिमूर तुर्लोव हे उपाध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून त्यांच्या पथकात आहेत. आनंदने उपाध्यक्षपदाची निवडणूक लढविणार नसल्याचे यापूर्वीच जाहीर केले आहे. मात्र, महासंघाच्या कार्यात, विशेषत: उदयोन्मुख आणि विकसनशील देशांमधील बुद्धिबळ विकासासाठी आपण सक्रिय योगदान देत राहू, असे त्याने स्पष्ट केले आहे.

# आयपीएल अन् विदर्भासाठी गाजवलं मैदान; आता टीम इंडियात एन्ट्री!

**महाईन्यूज । हरारे**

**भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये ३ टी-२० सामन्यांची मालिका सुरु आहे. या मालिकेत भारतीय संघ १-० ने आघाडीवर आहे. मालिकेतील दुसरा सामना हरारेच्या मैदानावर सुरु आहे. या सामन्यासाठी भारतीय संघाच्या प्लेईंग ११ मध्ये बदल करण्यात आला आहे. गेल्या सामन्यात पदार्पण करणाऱ्या अशोक शर्माला विश्रांती देण्यात आली आहे. तर त्याच्याजागी वेगवान गोलंदाज यश ठाकूरला टी-२० संघात पदार्पण करण्याची संधी देण्यात आली आहे.**



यश ठाकूर हा विदर्भाचा स्टार गोलंदाज आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये विदर्भाकडून खेळताना दमदार कामगिरी केली होती. त्यानंतर आयपीएल स्पर्धेतही तो चमकला. यासह भारतीय अ संघाकडून खेळताना त्याने आतापर्यंत दमदार गोलंदाजी केली आहे. २७ वर्षीय यश ठाकूरने आतापर्यंत ७४ टी-२० सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने ११० गडी बाद केले आहेत. यासह आयपीएल स्पर्धेत त्याने २२ सामन्यांमध्ये २७ गडी बाद केले आहेत. ही कामगिरी पाहता, त्याला भारतीय टी-२० संघात पदार्पण करण्याची संधी देण्यात आली आहे.

भारतीय संघाला आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्ध झालेल्या टी-२० मालिकेत हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. आयर्लंडविरुद्धची मालिका २-० ने, तर इंग्लंडविरुद्धची मालिका ४-० ने गमावली होती. पण झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या सामन्यात भारतीय संघाने दमदार पुनरागमन केलं. वैभव सूर्यवंशीच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर भारतीय संघाने हा सामना ७ गडी राखून जिंकला होता. आता मालिकेतील दुसरा सामना जिंकून भारतीय संघ मालिका खिशात घालण्याच्या प्रयत्नात असणार आहे.

### भारतीय संघ :

वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा,
इशान किशन (यष्टीरक्षक), श्रेयस अय्यर (कर्णधार),
तिलक वर्मा, रिंकू सिंग, शिवम दुबे, रवी बिश्नोई,
प्रिन्स यादव, यश ठाकूर, मयंक यादव.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। रविवार ।
दि. 26 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# गुरुवर्य अकॅडमी स्कूलमध्ये ‘शैक्षणिक वारी’ उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांकडून पर्यावरण, रस्ता सुरक्षा, जलसंवर्धन, डिजिटल सुरक्षा आदी विषयांवर जनजागृती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**गुरुवर्य अकॅडमी स्कूल येथे ‘शैक्षणिक वारी २०२६-२७’ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. ही वारी शाळेपासून ते विठ्ठल मंदिर, टाळगाव चिखलीपर्यंत मोठ्या दिमाखात काढण्यात आली. वारकरी परंपरा आणि शिक्षणाचा सुंदर संगम साधत विद्यार्थ्यांनी या वारीच्या माध्यमातून समाजाला विविध सामाजिक विषयांवर जनजागृतीचा प्रभावी संदेश दिला.**



वारीदरम्यान विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंग, अभंग आणि विठ्ठलाच्या नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक वारीत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रस्ता सुरक्षा, प्लास्टिकमुक्त भारत, वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, प्रदूषणमुक्त पर्यावरण, पर्यावरण संरक्षण, वीज बचत, डिजिटल सुरक्षा, आरोग्य हीच खरी संपत्ती, अन्न सुरक्षा आणि जागतिक तापमानवाढ यांसारख्या महत्त्वाच्या आणि संवेदनशील विषयांवर समाजाचे लक्ष वेधून घेतले.

या सोहळ्यास नगरसेवक विकासभाऊ साने, विनायक आबा मोरे आणि नगरसेविका सोनमताई मोरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी वारकरी नृत्य आणि विठ्ठल भक्तीगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थ्यांनी साहसी व मर्दानी खेळांची रोमहर्षक प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांची वाहवा मिळवली.

या कार्यक्रमाला शाळेचे संचालक भूषण मावळे, मुख्याध्यापिका ज्योत्स्ना मावळे, समन्वयक मोहना मॅडम व प्रतिभा मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. वैशाली अरगडे यांनी आभार मानले.

“ज्ञानाची वारी करूया, शिक्षणाचा दीप प्रज्वलित करूया” या प्रेरणादायी संदेशासह पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जागरूकता कर्तव्यभावना अधिक दृढ झाली.

### शैक्षणिक वारीचा संदेश


"ज्ञानाची वारी करूया, शिक्षणाचा दीप प्रज्वलित करूया" या संकल्पनेतून गुरुवर्य अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षा, पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन, डिजिटल सुरक्षा, आरोग्य व प्लास्टिकमुक्त भारताचा संदेश दिला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि कर्तव्यभावना अधिक दृढ झाली.

# संत साई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**संत साई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दि. २४ जुलै २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ८.३० वाजता आषाढी एकादशी मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. “भक्ती, शिस्त आणि संस्कार – आषाढी एकादशीचा उत्सव” या विषयावर आधारित हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.**






### वारकरी संस्कृतीचा संस्कार

आषाढी एकादशी निमित्त आयोजित कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना भक्ती, शिस्त, नैतिक मूल्ये आणि महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची ओळख करून देण्यात आली. पालखी सोहळा, अभंग गायन आणि 'पसायदान'च्या सादरीकरणातून संस्कार आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात माननीय प्राचार्य श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर , प्रमुख पाहुणे श्री सुभाषजी घेटे महाराज यांचे स्वागत करून झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन करण्यात आले तसेच भगवान विठ्ठल आणि माता रुक्मिणी यांचे पूजन करून कार्यक्रमाला भक्तिमय वातावरण लाभले.

यानंतर पारंपरिक पद्धतीने पालखी पूजन व पालखी सोहळा संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अभंग गायनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. पूर्वी जावळगी (इ. ५ वी अ), यश वानखेडे (इ. ५ वी ब), अवनी हांडे (इ. ९ वी क), ईशान राऊत (इ. ६ वी ब) आणि विभावरी सुतार (इ. ९ वी क) यांनी सुंदर अभंग सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यानंतर विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच श्रीमती मीरा कटमोरे मॅडम व त्यांच्या समूहाने सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्सवाची शोभा अधिक वाढवली.

कार्यक्रमाचा समारोप ‘पसायदान’ सादर करून करण्यात आला. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना भक्ती, शिस्त, नैतिक मूल्ये आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे महत्त्व समजले. हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# प्रियदर्शनी स्कूलमध्ये आषाढी एकादशी भक्तिभावात साजरी

## दिंडी, अभंग आणि हरिपाठातून विद्यार्थ्यांनी जपली वारकरी परंपरा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील प्रियदर्शनी स्कूलमध्ये आषाढी एकादशीचा पवित्र सण अत्यंत भक्तिमय आणि पारंपरिक वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.**



यावेळी विद्यार्थ्यांनी अभंग, भजन, हरिपाठ तसेच वारकरी परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारी सांस्कृतिक सादरीकरणे करून उपस्थितांची मने जिंकली. वारकरी वेशभूषेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक दिंडीने कार्यक्रमात भक्तिरसाची अनुभूती निर्माण केली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. भक्ती, संस्कार, एकात्मता आणि भारतीय परंपरेचे जतन करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. शाळेच्या व्यवस्थापनाने आणि मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक मूल्यांची जोपासना होत असल्याचे सांगितले.

"॥ पंढरीच्या विठ्ठलाची, जय जय राम कृष्ण हरी ॥" या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आणि आषाढी एकादशीचा उत्सव उत्साहात संपन्न झाला.

# विठ्ठल नामाच्या गजरात श्रमिकांची भव्य दिंडी आज

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त राष्ट्रीय श्रमिक आघाडी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शनिवारी (दि. २५ जुलै) भव्य दिंडी, कामगार वारकरी मेळावा आणि सांगता समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. वारकरी संप्रदायाची भक्ती, समता, बंधुता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भोसले यांनी सांगितले की, सकाळी ११.३० वाजता संत तुकारामनगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातून दिंडीला प्रारंभ होईल. श्री विठ्ठल-रुक्मिणींची प्रतिमा, संत तुकाराम महाराजांची गाथा, संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी तसेच माऊलींची पालखी दिंडीत सहभागी होणार आहे.

तुकारामनगर, वल्लभनगर आणि महेशनगर परिसरातून मार्गक्रमण करत दिंडी दुपारी सुमारे २.३० वाजता आचार्य अत्रे रंगमंदिरात पोहोचेल. त्यानंतर कामगार वारकरी मेळावा, वैष्णव मेळावा, भजन-कीर्तन आणि



सांगता समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी देहू आणि आळंदी येथील कीर्तनकार, भजनी मंडळे, वारकरी, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे.

या दिंडीत सुमारे दोन ते अडीच हजार श्रमिक, वारकरी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि विविध समाजघटकांतील भाविक सहभागी होणार असल्याचे भोसले यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, आमदार महेश लांडगे, शंकरशेठ जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्यासह विविध मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. यावेळी यशवंतभाऊ भोसले म्हणाले, "वारकरी संप्रदाय समाजात समता, बंधुता, सेवा आणि मानवतेची प्रेरणा देणारा आहे. या पवित्र सोहळ्यात पिंपरी-चिंचवडकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन विठ्ठल भक्तीचा आनंद घ्यावा."

# विवेकपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली पाहिजे: उद्योजक जाधव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सक दृष्टीकोनातून पहावे आणि पाठ्य पुस्तकांशिवाय अवांतर ज्ञान मिळविणे, शिस्त, वृत्तपत्र वाचन, बाजारपेठेची समज आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून उच्च शिक्षण घ्यावे. व्यवस्थापन शास्त्र शिक्षणामुळे योग्य आणि अयोग्य यामधील फरक ओळखण्याची आणि विवेकपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली पाहिजे असे मार्गदर्शन टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीजचे डायरेक्टर शंकर जाधव यांनी केले.**




कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे यांनी पुणे मॅनेजमेंट स्कूलच्या चौथ्या बॅचचे स्वागत करताना पीसीईटीच्या समृद्ध शैक्षणिक वारशाचा उल्लेख केला. त्यांनी उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, चॉईस बेस्ड शिक्षणपद्धती, नियमित औद्योगिक भेटी, उद्योगतज्ज्ञांशी संवाद, प्रोजेक्ट-आधारित शिक्षण आणि 'वन फॅकल्टी, वन इंडस्ट्री' याची माहिती दिली व स्वतःच्या विकासासाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या च्या पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या येथे पुणे मॅनेजमेंट स्कूलमध्ये 'दीक्षारंभ २०२६–२७' या नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी पीसीइटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे, एमइडीसी उपाध्यक्ष व पीसीयू गव्हर्निंग बोर्ड सदस्य सचिन इटकर, पीसीयू ग्रुप मॅनेजमेंट प्रोग्राम सल्लागार डॉ. गणेश राव, स्कूल ऑफ मॅनेजमेंट डीन डॉ. अमित पाटील, टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीजचे डायरेक्टर शंकर जाधव, केपीआयटी एक्झिक्युटिव्ह बोर्ड सदस्य पंकज साठे, सीए प्रमोद जैन, प्राध्यापक विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

सचिन इटकर यांनी विद्यार्थ्यांनी विकसित भारत २०४७ च्या प्रवासात सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. सकारात्मक दृष्टिकोन, सातत्याने ज्ञान संपादन, वाचनाची सवय, स्पष्ट करिअर ध्येय आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असेही सांगितले. पंकज साठे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटलायझेशन आणि नवोन्मेषामुळे व्यवसाय क्षेत्रात वेगाने होत असलेल्या बदलांची माहिती दिली. सीए प्रमोद जैन यांनी सांगितले की, कालावधीत ज्ञान, नेटवर्किंग आणि नेतृत्व कौशल्ये विकसित करून पालकांच्या गुंतवणुकीचे सर्वोत्तम मूल्य निर्माण करण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविक करताना डॉ. अमित पाटील यांनी 'दीक्षारंभ' म्हणजे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडण्याच्या प्रवासाची सुरुवात आहे असे सांगितले. नवोन्मेष, उत्कृष्टता, प्रामाणिकपणा, आत्मविश्वास, भावनिक बुद्धिमत्ता आणि आत्मशोध यांचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. पीसीयू चे कुलपती तथा पीसीइटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील, पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ संतोष सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आला होता.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या 'माण ते बालेवाडी' टप्प्याला 'सीएमआरएस'ची मंजुरी!

## १३ किलोमीटर मार्गावरील सर्व वैधानिक चाचण्या यशस्वी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हिंजवडी आयटी पार्कला शहराशी जोडणाऱ्या पुणे मेट्रो मार्गिका-३च्या प्रवासी सेवेचा मार्ग आता अधिकृतरीत्या मोकळा झाला आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयांतर्गत कार्यरत मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी (सीएमआरएस) माण स्थानक ते आर. के. लक्ष्मण म्युझियम (बालेवाडी) या १२ स्थानकांदरम्यानच्या टप्प्यावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी २३ जुलै २०२६ रोजी तात्पुरते प्राधिकरण प्रदान केले आहे.**






या मंजुरीमुळे सीबीटीसी सिग्नलिंग प्रणालीअंतर्गत 'एटीपी' मोडवर मेट्रो ताशी ८० किलोमीटर या कमाल वेगाने धावू शकणार आहे. सर्व वैधानिक तपासण्या, चाचण्या आणि सुरक्षा मानकांची पूर्तता झाल्यानंतरच ही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे १३ किलोमीटर लांबीचा हा दुहेरी मार्ग ७५० व्होल्ट डीसी थर्ड रेल ट्रॅक्शन प्रणालीवर कार्यरत राहणार आहे.

मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी ५ ते ८ जुलै २०२६ या कालावधीत 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड' (PITCMRL) च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या मार्गाची सखोल पाहणी केली होती. प्राथमिक तपासणी आणि त्यानंतरच्या आढाव्यादरम्यान सुरक्षा आयुक्तांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवरील पूर्तता अहवाल कंपनीने सादर केला. प्रत्यक्ष मंजुरी देण्यापूर्वी या मार्गावर मेट्रोची निश्चिती चाचणी यशस्वीरीत्या पार पडली. तसेच, सुरक्षा आयुक्तांनी सर्व प्रमुख मेट्रो प्रणालींशी संबंधित तांत्रिक मंजुरी, आयएसए प्रमाणपत्र, शासनाच्या मुख्य विद्युत निरीक्षकांचे (CEIG) ना-हरकत प्रमाणपत्र, दूरसंचार विभागाचा (DOT) परवाना, सर्व १२ स्थानकांसाठी अग्निशमन विभागाची ना-हरकत प्रमाणपत्रे, तसेच स्थापत्य, ट्रॅक, सिग्नलिंग, टेलिकॉम आणि रोलिंग स्टॉक प्रणालींसंदर्भातील सर्व प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी केली.

या महत्त्वपूर्ण टप्प्याबाबत बोलताना 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड'चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल कुमार सैनी म्हणाले, "पुणे मेट्रो मार्गिका-३ला मिळालेली ही वैधानिक सुरक्षा मंजुरी प्रकल्पाच्या दृष्टीने एक ऐतिहासिक टप्पा आहे. सुरक्षितता, उच्च गुणवत्ता आणि उत्कृष्ट अभियांत्रिकीप्रती असलेली आमची बांधिलकी यातून अधोरेखित होते. तसेच पुणेकरांच्या सेवेत आधुनिक मेट्रो दाखल करण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने आम्ही आणखी एक निर्णायक पाऊल पुढे टाकले आहे. सुरक्षा आयुक्तांची ही मंजुरी हिंजवडीच्या आयटी हबला पुणे शहराशी जोडणाऱ्या आधुनिक, सुरक्षित आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या प्रत्यक्ष प्रवासी सेवेच्या शुभारंभाच्या दिशेने अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे."

> हिंजवडी ते शिवाजीनगर या 'पुणे मेट्रो मार्गिका-३' प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला मिळालेली सुरक्षा आयुक्तांची मंजुरी ही पुणेकरांसाठी आणि पीएमआरडीएसाठी अत्यंत समाधानकारक बाब आहे. हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि नागरिकांना सुरक्षित, वेगवान तसेच पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प निश्चितच एक 'मैलाचा दगड' ठरणार आहे. या मंजुरीमुळे प्रकल्पाने एक मोठा आणि निर्णायक टप्पा गाठला असून, उर्वरित प्रक्रिया वेगाने पूर्ण करून ही प्रवासी सेवा लवकरात लवकर नागरिकांसाठी सुरू करण्यासाठी पीएमआरडीए प्रशासन कटिबद्ध आहे.
>
> **- डॉ. अभिजीत चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए.**

# डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांना 'शिक्षणमहर्षी' पुरस्कार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शिक्षण क्षेत्रात दूरदृष्टी, सामाजिक बांधिलकी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांना राष्ट्रीय श्रमिक आघाडी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 'शिक्षणमहर्षी' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर, पिंपरी येथे आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी आज (दि. २४) आयोजित पत्रकार परिषदेत दिली.**




यावेळी बोलताना यशवंतभाऊ भोसले म्हणाले की, शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. हीच भूमिका स्वीकारत डॉ. पी. डी. पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. विशेषतः कामगार, शेतकरी, ग्रामीण व मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण संस्थांनी गुणवत्ता, संशोधन, कौशल्य विकास आणि आधुनिक शिक्षणपद्धती यांचा प्रभावी संगम साधला आहे.

डॉ. पी. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली डी. वाय. पाटील विद्यापीठाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, वैद्यकीय शिक्षण, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कृषी, जैवतंत्रज्ञान तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, आधुनिक पायाभूत सुविधा, संशोधनाला चालना आणि सामाजिक उत्तरदायित्व या मूल्यांमुळे संस्थेने देशभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याबाबत डॉ. पाटील यांनी सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली असून, शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या या बहुमोल कार्याची दखल घेत राष्ट्रीय श्रमिक आघाडीने त्यांना 'शिक्षणमहर्षी' पुरस्काराने गौरविण्याचा निर्णय घेतल्याचे भोसले यांनी सांगितले.

हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून, शिक्षण क्षेत्रात निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या सर्व शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षणसेवकांचा सन्मान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सन्मानामुळे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेकांना प्रेरणा मिळेल, असा विश्वासही यशवंतभाऊ भोसले यांनी व्यक्त केला.